# कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

इमेल: sp.chandrapur@mahapolice.gov.in

दूरध्वनी क्र.: ०७१७२-२५५१०० | फॅक्स क्र.: ०७१७२-२५५८००

## प्रेस नोट

**पोलीस ठाणे: राजुरा (जिल्हा चंद्रपूर)** **दिनांक: ३०/०५/२०२६**

**विषय: धोपटाळा कॉलनी येथील महिला खुनाच्या गुन्ह्यातील अज्ञात आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा (LCB) चंद्रपूर व पोलीस स्टेशन राजुरा यांच्या संयुक्त पथकाकडून २४ तासांच्या आत अटक.**

दिनांक २९/०५/२०२६ रोजी फिर्यादी नामे **रणधीर राजू कुंभारे** (वय ३७ वर्षे, रा. महाकाली कॉलनी, कपिल चौक, चंद्रपूर) यांनी पोलीस स्टेशन राजुरा येथे लेखी तक्रार दाखल केली. सदर तक्रारीनुसार, दिनांक २९/०५/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास त्यांच्या सासूच्या शेजाऱ्यांनी फोनद्वारे माहिती दिली की, फिर्यादीची पत्नी **सौ. शितल कुंभारे** हिने रक्ताच्या उलट्या केल्या असून तिची काहीही हालचाल होत नाही. या माहितीवरून फिर्यादी तात्काळ मोपेड वाहनाने धोपटाळा, ता. राजुरा येथील सासूच्या घरी पोहोचले. त्यांनी घरात जाऊन पाहिले असता, राहत असलेल्या घराच्या पाठीमागील देव्हाऱ्याच्या खोलीत त्यांची पत्नी खाटेवर रक्ताच्या थारोळ्यात मृत अवस्थेत आढळून आली. कोणातरी अज्ञात इसमाने धारदार शस्त्राने गळा चिरून तिचा निर्घृण खून केल्याचे निष्पन्न झाले. फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन राजुरा येथे **अपराध क्रमांक ५१६/२०२६, कलम १०३(१), ३३२(२) बी.एन.एस. (BNS)** अन्वये गुन्हा नोंदवून तपास चक्र गतीमान करण्यात आले.

सदर गंभीर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून मा. पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांनी अज्ञात आरोपीचा शोध घेण्याकरिता स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे आणि पोलीस स्टेशन राजुराचे पोलीस निरीक्षक आसिफ राजा शेख यांना तात्काळ आदेशित केले. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखा व राजुरा पोलिसांचे विशेष पथक तयार करण्यात आले. पथकाने घटनास्थळाचा तांत्रिक तपास, गोपनीय माहिती आणि सायबर सेलच्या मदतीने संशयित आरोपीचा माग काढला. तपासादरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे, पोउपनि विनोद भुरले व त्यांच्या पथकाने तात्काळ रापनपल्ली (ता. चेन्नूर, जि. मंचीरियाल, राज्य- तेलंगणा) येथे जाऊन संशयित आरोपी नामे **राजेश व्यंकटी अट्टेटेला** (वय ३५ वर्षे, रा. रेपनपल्ली, ता. चेन्नूर, जि. मंचीरियाल, तेलंगणा) याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीला पुढील कायदेशीर कारवाई व तपासाकरिता पोलीस स्टेशन राजुरा यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

### मार्गदर्शन व कामगिरी करणारे अधिकारी व अंमलदार (स्टाफ):

सदर धडाकेबाज कामगिरी मा. पोलीस अधीक्षक **श्री. आयुष नोपानी साहेब**, मा. अपर पोलीस अधीक्षक **श्री. ईश्वर कातकडे साहेब**, उपविभागीय पोलीस अधिकारी **श्री. सुधीर नंदनवार साहेब** आणि पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा (स्थागुशा) चंद्रपूर **श्री. अमोल काचोरे साहेब** यांच्या मार्गदर्शनाखाली खालील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने बजावली आहे:

**■ स्थानिक गुन्हे शाखा (LCB), चंद्रपूर:**

पो.नि. अमोल काचोरे, पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सर्वेश बेलसरे, पोउपनि सुनील गौरकार, पोहवा/सुभाष गोहोकार, पोहवा/किशोर वैरागडे, पोहवा/अजय बागेसर, पोहवा/सतिश अवथरे, पोहवा/इम्रान खान, पोहवा/संतोष येलपुलवार, पोहवा/गणेश मोहुर्ले, पोअं/

हिरालाल गुप्ता, पोअं/शेखर माथनकर, पोअं/गोपीनाथ नरोटे, पोअं/शशांक बादामवार, पोअं/किशोर वाकाटे, चापोअं/वृषभ बारसिंगे, चपोअं/गजानन मडावी.

**■ पोलीस स्टेशन, राजुरा:**

पो.नि. आसिफ राजा शेख, सपोनि लक्ष्मण लोकरे, पोउपनि दिपक ठाकरे, पोउपनि पराग उल्लेवार, पोउपनि अतुल राठोड, सफौ/किशोर तुमराम, पोहवा/अनुप डांगे, पोहवा/विक्की निवार्न, पोअं/शाफिक शेख, पोअं/मिलीद जांभुळे, पोअं/महेश बोडगेलवार, पोअं/राजु दुबे.

**■ सायबर सेल, चंद्रपूर:**

पोहवा/कार्तिक खनके, पोअं/गुणवंत, पोअं/अनिमेश.

**(अमोल काचोरे)**
**पोलीस निरीक्षक,**
**स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर**